


**बारामती :** भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त विद्या प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय व बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया, बारामती सेंटरच्या वतीने वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पी. एम. हर्षे यांच्याकडून फिरता चषक स्वीकारताना नीरजा करंदीकर व अमृता पंडित. सोबत प्राचार्य प्रताप बोराडे व के. सी. जोशी.

# अभियांत्रिकी महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

## विद्या प्रतिष्ठान : नीरजा करंदीकर प्रथम

**बारामती, ता. २३ :** "भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांचे अभियांत्रिकी क्षेत्रातील काम अजोड होते," असे प्रतिपादन विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप बोराडे यांनी केले.

विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त विद्या प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय व बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया, बारामती सेंटरच्या वतीने वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'हायब्रीड व्हेईकल्स - शाप की वरदान' व 'डिझास्टर मॅनेजमेंट सिस्टिम ऑफ इंडिया' या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

नीरजा करंदीकर व कोमल गुप्ता यांनी या स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. बिल्डर असोसिएशनचे विश्वस्त पी.एम. हर्षे हे या प्रसंगी उपस्थित होते. डॉ. निर्मल साहुजी यांनी 'ओरिजिन ऑफ युनिव्हर्स' व प्रा. सुजय देशपांडे यांनी 'इंटिग्रेटेड इंजिनिअरिंग' या विषयावर माहिती दिली. प्रताप बोराडे यांनी विश्वेश्वरय्या यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

या प्रसंगी बिल्डर असोसिएशनच्या बारामती सेंटरचे अध्यक्ष के.सी. जोशी, मनोज पोतेकर, अविनाश लगड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. समन्वयक डॉ. एस.बी. ठाकरे होते. सूत्रसंचालन नागेश सूर्यवंशी यांनी केले, तर सुशील जाधव यांनी आभार मानले.

सतीश तावरे, सुनील भोसले, अमोल भोसले, प्रा. नरुले, प्रा. देशमुख, प्रा. वाळवेकर, प्रा. शेलार आदींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.